# मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचार विषयक बातम्या :

# एक संवादशास्त्रीय अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या
आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा अंतर्गत पीएच.डी.
(वृत्तपत्रविद्या व जनसंवाद) पदवीसाठी सादर
करावयाच्या शोध प्रबंधाचे प्रारुप (Synopsis)

संशोधक
**साहेब भिवा गजभारे**
माध्यमशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मार्गदर्शक
**डॉ. राजेंद्र नारायणराव गोणारकर**
सहयोगी प्राध्यापक,
माध्यमशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

**ऑगस्ट २०२१**

# मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचार विषयक बातम्या : एक संवादशास्त्रीय अभ्यास

**प्रस्तावना :**

वृत्तपत्र हा समाजाचा आरसा असतो. समाजात घडणाऱ्या घडामोडींचे प्रतिबिंब वृत्तपत्रातून उमटत असते. पण समाजातील सर्वच घडामोडीचे सारखेच प्रतिबिंब वृत्तपत्रातून उमटते असे दिसत नाही. समाजात आज मोठया प्रमाणावर दलित अत्याचाराची प्रकरणे घडत आहेत. त्याची अनेक कारणे आहेत. हेच दलित अत्याचाराचे प्रतिबिंब किंवा चित्रण वृत्तपत्रा मधून जसेच्या तसे घडते का? हा संशोधनाचा विषय जर असे घडत नसेल तर वृत्तपत्रांना समाजाचा आरसा म्हणावे का? असा प्रश्न उभा राहतो.

भारतात २०१५ च्या आकडेवारी नुसार अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीवरील अत्याचार (प्रतिबंध) कायदा १९८९ (अॅट्रोसिटी, प्रिव्हिशन अॅक्ट) या कायद्याखाली एकंदर ४४७३९ गुन्हयांची नोंद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रात नोंदवले गेलेल्या गुन्हयांची संख्या २०१५ मध्ये २२७६ तर २०१८ मध्ये १०५६ आहे. महाराष्ट्र पोलिसांकडे तपासासाठी आजवरच्या (२०१८) एकंदर ८३२४ गुन्हयांची प्रकरणे प्रलंबित आहेत. तर देशभरातील न्यायालयात २०१५ पर्यंत एकंदर १,१३,३९३ खटले या कायद्याखाली प्रलंबित असल्याची आकडेवारी केंद्रसरकाच्या सामाजिक न्याय मंत्रालयाने दिलेली आहे.

वरील मुद्दे लक्षात घेता महाराष्ट्रातील राज्यस्तरीय प्रादेशिक दैनिकांचे दलित अत्याचाराच्या घटनांना स्थान देण्याचे स्वरुप काय आहे, त्यांची भूमिका काय आहे, अत्याचाराच्या घटना प्रसिध्द करण्यामागे त्यांची मानसिकता काय आहे हे समजून घेण्यासाठी

**मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचार विषयक बातम्या : एक संवादशास्त्रीय अभ्यास प्रस्तुत विषयाची निवड केली आहे.**

**संशोधन विषयाचे महत्व :-**

दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ, ही महाराष्ट्रातील महत्वाची मराठी दैनिके आहेत. प्रत्येक वृत्तपत्राची ध्येयधोरणे आणि भूमिका वेगवेगळया आहेत. त्यामुळे प्रत्येक वृत्तपत्राचा दलित अत्याचाराच्या घटनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा आहे. एकीकडे दलित अत्याचाराच्या नोंदीची आकडेवारी वाढते आहे. तुलनेत त्याचे प्रतिबिंब वृत्तमानपत्रात पडतांना दिसत नाही असे का? हे समजून घेण्यासाठी प्रस्तूत अभ्यासाची निवड केली आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :-**

एखाद्या विषयाचे संशोधन करतांना उद्दिष्टये स्पष्ट करणे आवश्यक असते.

**मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचार विषयक बातम्या : एक संवादशास्त्रीय अभ्यास**

या विषयी अभ्यास करतांना पुढील उद्दिष्टये समोर ठेवली आहे.

१) मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचाराच्या बातम्यांचा अभ्यास करणे त्याची चिकित्सा करणे

२) दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ मधून प्रसिध्द होत असलेल्या दलित अत्याचारांच्या बातम्यांची तुलना करणे

३) काळानुरुप बदलणाऱ्या मराठी पत्रकारीतेचे आणि दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक बदलाचे विश्लेषण करणे.

४) दलितांवर सातत्याने होत असलेल्या अत्याचाराचे स्वरुप व व्याप्ती विषयीचे नेमके चित्र स्पष्ट करणे.

**समस्या सूत्रणः**

महाराष्ट्रात दलित समुहावर जातीयव्देषातून अत्याचार होणाऱ्या घटनांचे प्रमाण लक्षनिय आहे. सामाजिक विषमता, उच्चनिचता, भेदभाव, जातीयता, धर्मवाद, वर्णस्ववादी, वृत्ती हे अत्याचाराचे महत्वाचे मुद्दे आहेत. खैरलांजी मधील मायलेकी वरील बलात्कार नांदेड मधील सातेगाव येथे मातंग तरुणाचे डोळे फोडण्यात आले. फुलंब्री तालुक्यामध्ये आज दलित व्यक्तींना ठार मारले, जालना जिल्हयातील नानेगांव मध्ये दलित संरपंचावर जातीवाचक शिवीगाळ करुन प्राणघातक हल्ला, अहमदनगरमध्ये १० वी तील विद्यार्थ्यांची केलेली हत्या, पूर्णा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंती मिरवणूकीवर दगडफेक असे शेकडो उदाहरणे महाराष्ट्रात घडत आहेत. ग्रामीण भागातील जत्रा उत्सवामध्ये सुध्दा दलितांवर अन्याय अत्याचार घडत आहेत. प्रस्तूत संशोधनात दलित अत्याचारामागची कारणे त्याची मिमांसा त्यामधील मानसिकता तपासण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**संशोधन पध्दती :-**

संशोधन क्षेत्र असो की, व्यक्तीचे जिवन असो प्रत्येकाला आराखडयाची आवश्यकता असते. संशोधन करीत असतांना निश्चित अशी दिशा लागते. दिशा नसेल तर संशोधन कार्याला अर्थ प्राप्त होत नाही. आराखडा हा संशोधकाचे श्रम वेळ, पैशाची बचत, करुन अध्ययनात उद्‌भवणाऱ्या संध्यात्मक त्रुटीच्या संभावनेला दूर करणारा असतो. प्रत्येक संशोधनाचे निश्चित ध्येय उद्दिष्टये असते. या ध्येय उद्दिष्टाच्या अशा अन्वेषणासाठी उपयोगात आणलेली योजना म्हणजेच संशोधन आराखडा होय.

**व्याख्या :-**

**१)** रसेल. ॲक ऑफ यांच्या मते,

“ ज्याबाबी प्रत्यक्षात उतरावयाच्या असतात त्या अवतारण्या पूर्वीच त्या संबंधी निर्णय घेण्याची प्रक्रिया म्हणजे संशोधन आराखडा. ”

सदर संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दती वापरण्यात येणार आहे.

आधूनिक काळात सर्व क्षेत्र वर्णन प्रधान होत आहेत. त्या दृष्टिने वर्णनात्मक संशोधन आराखडयाचे महत्व अनन्य साधारण बनले आहे. वर्णनात्मक पध्दतीत विषयाचे घटक स्पष्ट असल्याने प्रथ्थ्यकरणाचा प्रश्न गंभिर झालेला असतो. अशावेळी वर्णनाव्दारे शोध विषयाचे स्वरुप स्पष्ट करण्यास या पध्दतीचा वापर होतो. याशिवाय वर्णन करने महत्वाचे असते. कोणत्याही शोधाचे उद्दिष्टये नवे सत्य प्रकाशात आणणे हे असते. नविन माहीती, नवे ज्ञान, नवा सिध्दांत, प्रस्थापित करणे यासंबंधी परस्पर जाणीव करु देणे, दृष्टिकोण मांडणे, नवी माहिती सादर करणे या संदर्भात महत्वाचे ठरतात. मराठी वृत्तपत्रातील दलित अत्याचाराचे प्रतिबिंब याची चिकित्सा करतांना, अभ्यास करतांना सद्यस्थितीतील वृत्तपत्रांची भूमिका त्याची उद्दिष्टये तसेच त्यांचे स्वरुप आणी त्यांच्या समोरील समस्यांचा देखिल अभ्यास केला गेला या सर्व नव्या ज्ञानाचा अभ्यास या संशोधनात वर्णनात्मक पध्दतीने करण्यात आला आहे.

**संशोधनाचे गृहितकृत्ये :-**

कुठल्याही सामाजिक संशोधनात प्रमयाकडे वैज्ञानिक पध्दतीने वाटचाल करावी लागते यासाठी संशोधकाला या विषयीचे पूर्वज्ञान व अनुभव असावा लागतो. आणि या अनुभवांच्या आधोर संशोधक आपल्या संशोधन विषयासंबंधी गृहितके निश्चित करीत असतो. या गृहितकांच्या आधारे सामान्य अनुमान काढत असतो. हे अनुमान संधोधकाला संशोधक कार्यासाठी मार्गदर्शक ठरत असते. विषयाच्या विविध पैलूंच्या अध्ययनाच्या आधारे अभ्यासक आपल्या संशोधन समस्येच्या निराकरणासाठी संभाव्य उत्तराचा शोध घेतो आणि सिध्दांताची मांडणी करतो, या संभाव्य गृहितकृत्ये असे म्हणतात. गुड व हॅट यांच्या मते, गृहितकृत्ये म्हणजे अशी मान्यता आहे की, ज्याने सत्य सिध्द करण्यासाठी प्रयोगात्मक परिक्षण केले जावू शकते.

१) मराठी वृत्तपत्र दलित अत्याचाराविषयी जाणीव जागृती वाढवतांना दिसतात.

२) वृत्तपत्रांचे संपादक, वार्ताहार, दलित अत्याचारग्रस्तांना न्याय मिळवून देण्यात महत्वाची भूमिका अदा करतात.

३) वृत्तपत्रे समाजाच्या तळापर्यंत जावून लोकांचे मन परिवर्तन करु शकतात.

४) मराठी वृत्तपत्रे दलित अत्याचार विषयक बातम्यांच्या पाठपुराव्या बाबत कमी पडतांना दिसतात.

**तथ्य संकलन :-**

संशोधन पध्दती ही वैधानिक पध्दती आहे. सामाजिक विषयात संशोधन करतांना संशोधकाला वैधानिक पध्दतींचा व तंत्रांचा अवलंब करुनच निष्कर्षाचे किंवा सिध्दांताचे प्रतिपादन करावे लागते. सामाजिक संशोधनात समस्यांचे निर्धारण झाले की, मग संशोधकाला त्या समस्या विषयी संबंधित तथ्य माहिती व सामग्रीचे संकलन करावे लागते. त्यानंतर त्याला संकलित केलेल्या तथ्यांचे वर्गीकरण केल्यानंतर अध्ययन विषयासी संबंधित असणाऱ्या संकल्पनांची निर्मिती करावी लागते. **तथ्य संकलनाचा अर्थ :-** तथ्य संकलनाचा विचार करण्यापूर्वी तथ्यांचा वैज्ञानिक अर्थ लक्षात घेणे आवश्यक आहे. वैधानिक विवेचनात तथ्यांचा बराच उपयोग करण्यात येतो. श्रीमती पॉलिन यंग यांनी म्हटल्या प्रमाणे “ तथ्य हा शब्द वेधानिक लिखानात वारंवार वापरला जातो. तरी अजून या शब्दाची व्याख्या करणे अतिशय कठिण आहे.”

**व्याख्या :-**

१) गुड आणि हॅट यांच्या मते :- “ तथ्य एक अनुभव सिध्द सत्यपनीय निरिक्षण आहे.”

२) दुर्खिम यांच्या मते :- “सामाजिक तथ्य व्यवहाराचा (विचार, अनुभव किंवा क्रिया) असा पक्ष आहे की, ज्याचे निरीक्षण वस्तूनिष्ठ रुपात शक्य आहे आणि जे एका विशिष्ट तऱ्हेने व्यवहार करण्यास बाध्य करते.”

तथ्याचे मुख्यतः दोन प्रकार पडतात.

**१) प्राथमिक तथ्य :-**

संशोधक स्वतः घटना स्थळावर उपस्थित राहून अवलोकन, अनुसूची, मुलाखत, प्रश्नावली, इत्यादीच्या माध्यमातून माहिती व आकडेवारी गोळा करतात.

**२) व्दितीयक तथ्य :-**

प्राथमिक तथ्य ही स्वतः संशोधनकर्ता संकलित करीत असतो. परंतू व्दितीयक तथ्य मात्र संशोधनकर्ता स्वतः संशोधन क्षेत्रात जावून संबंधित व्यक्तीकडून गोळा करीत नाही. व्दितीय तथ्य ही इतर व्यक्तींनी पूर्वीच गोळा केलेली असून ती लिखित स्वरुपाची असतात. लुंडबर्गच्या मते, “शिलालेख, स्तूप, उत्खनातून सापडलेले मानवी सापळे, भौतिक वस्तू इत्यादी ऐतिहासिक स्त्रोतातून प्राप्त तथ्य देखील व्दितीयक तथ्य होत. ”

सामाजिक शास्त्रात संकलित केल्या जाणाऱ्या तथ्यांची उगममस्थान दोन आहेत. १) कागदपत्रे, पुस्तके, वृत्तपत्रे व अहवाल यांचा उपयोग करुनच तथ्य प्राप्त करणे.

२) प्रत्यक्षात संशोधकाने उत्तरदाव्यास विचारण्यात आलेल्या प्रश्नावरुन व त्यांनी दिलेल्या उत्तरावरुन व हावभावाच्या निरीक्षणावरुन तथ्य प्राप्त होवू शकतात.

प्रस्तुत संशोधन कार्यामध्ये अनेक माध्यमातून तथ्य संकलित केले जातील ज्यात अनेक प्राथमिक सर्वेक्षण, अधिकृत शासकीय अहवाल, संस्था आणि संशोधक व्यक्ती यांचा समावेश असेल. शासकीय अधिकृत माहिती मध्ये वर्गीकृत जाती व वर्गीकृत जमातीच्या आयुक्तालयांनी प्रसिध्द केलेल्या वार्षिक अहवालांना तसेच राष्ट्रीय

गुन्हे अन्वेषण विभागाने प्रसिध्द केलेल्या अहवालाचा समावेश असेल. दलित चळवळीतील नेते कार्यकर्ते यांच्या मुलाखती, दैनिकांचे संपादक, बातमीदार यांच्याशी चर्चा करुन त्यांची दलित अत्याचाराविषयी भुमिका जाणून घेतली जाईल तसेच दलित अत्याचार विरोधी समितीच्या सदस्यांसोबत चर्चा विमर्श करुन तसेच सत्यशोधन समितीचे, सत्यशोधन अहवाल या मधून तथ्य गोळा केली जातील.

दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ या वृत्तपत्राच्या एका महिण्याच्या अंकाच्या पहिल्या पृष्ठावरील दलित अत्याचार विषयक वार्तांचे आशय विश्लेषण केले जाईल. तसेच या तिन्ही वर्तमान पत्राचा तौलनिक अभ्यास केला जाईल.

दैनिक लोकसत्ता, दैनिक लोकमत, दैनिक सकाळ या वाचकांची प्रश्नावली व्दारे दलित अत्याचार या विषयक वार्तांकन करतांना कशा प्रकारची भूमिका राहते हे समजून घेतले जाईल. यासाठी तिनशे वाचकांकडून प्रश्नावली भरुन घेतली जाईल.

**संभाव्य प्रकरणे :-**

**प्र. १) प्रकरण पहिले दलित संकल्पना व स्वरुप**

**प्र. २) संशोधन पध्दती**

**प्र. ३) दलितावरील अत्याचारांचे स्वरुप**

**प्र. ४) दलित अत्याचाराच्या बातम्यांचे तौलनिक आशय विश्लेषण**

**प्र. ५) निष्कर्ष व उपसंहार**

## संदर्भ ग्रंथ

१) लिंबाळे शरणकुमार (संपा) दलित पँथर भूमिका चळवळ, दिलिपराज प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती, २००९

२) शिंदे वि.रा. भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न, कौशल्य प्रकाशन प्रथम आवृत्ती २० जुलै १९३३

३) आंबेडकर बी.आर. अस्पृश्य मुळचे कोण, सुगत प्रकाशन नागपूर, व्दितीय आवृत्ती ३ जुलै २००९

४) बगाडे उमेश, दलित जाणीवेतील दंद्व प्रभूत्व आणि प्रतिकार, द ताईची प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती ०६ ऑक्टोबर २०११

५) गुरु गोपाळ आणि व्ही. गीता, दलित बौध्दिक कृती कार्यक्रम अलिकडचे प्रवाह, सुगाव प्रकाशन पुणे प्रथम आवृत्ती २०१५.

६) थोरात सुखदेव, दलित निरंतर विषमता आणि दारिद्रय, सुगावत प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती ६ डिसेंबर २००७

७) थोरात सुखदेव व प्रशांत नेंगी, महाराष्ट्रातील सामाजिक भेदभाव, नागरी हक्कभंग आणि अत्याचार, सुगावा प्रकाश पुणे, व्दितीय आवृत्ती एप्रिल २०११.

८) मुणगेकर भालचंद्र भारतातील आर्थिक सुधारण आणि दलित एक आंबेडकरी दृष्टिकान, सुगावा प्रकाशन पुणे, व्दितीय आवृत्ती मार्च २०१२.

९) गायकवाड शरद, जवखेडचे जातीय हत्याकांड : साखरबाईचा आक्रोश कुठे आहात आपण? जातीय अत्याचार विरोधी कृती समिती, महाराष्ट्र प्रकाशित, प्रथम आवृत्ती १९ जानेवारी २०१५

१०) डांगळे अर्जुन दलित विद्रोह लोकवाङःमय, गृह प्रकाशन, मुंबई चौथी आवृत्ती २०११

११) दिघे सुनिल समता संघर्ष मार्गदर्शिका लोकवाङःमय गृह प्रकाशन मुंबई, प्रथमावृत्ती जानेवारी २०१६.

१२) Zeliot Eleanor, from untouchable to Dalit Essays on the Ambedkar Movement Manohar publisher, New Delhi first published 1992.

13) Aloysius Irudayam S.J. Mugabhai Jayshree P, lee Joela, Dalit Woman speak out, caste class and Gender voilance in India, Zubeen New Delhi 2011

14) National Comission for Schedule Caste first annual report 2004-2005

15) Various report of crime in India , National crime records Buvearu ministery of Home affairs, Government of India.

१६) चावरे यशवंत अनुसूचित जाती-जमाती कल्याण व संरक्षण कायदे आणि त्यांची अंमलबजावणी मनोविकास प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती ८ जून २००९

१७) गायकवाड शरद (प्रका), ॲट्रोसिटी कायद्याची २० वर्षे, यश अपयशाची कारणीमांसा जातीवरच्या अंताची दिशा, रिपब्लिकन पँथर्स प्रकाशन, मुंबई व्दितीय आवृत्ती २९ सप्टेंबर २०१०

१८) सिरसाट प्रकाश, दलित चळवळ आकलनाच्या दिशेने हरिती पब्लिकेशन पुणे प्रथमावृत्ती २०१६

१९) कांबळे उत्तम (संपा) श्रमिकांचे जग काल आज आणि उद्या, लोकावाङःमय गृह प्रकाशन मुंबई प्रथमावृत्ती २०१५.

२०) नगराळे मोहन विदर्भातील दलित चळवळ हाडळे प्रकाशन, नागपूर प्रथम आवृत्ती २०१५

२१) माहिती पुस्तिका, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ व नागरी हक्क संरक्षण कायदा १९५५ सामजिक, न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, जिल्हा दक्षता व नियंत्रण समिती, सिंधुदूर्ग.

२२) रामचंद्र वर्मा (संपा) संक्षिप्त शब्द सागर, नागरी प्रचारीणी सभा, काशी नवम संस्कारण, १९८७.

२३) बोधनकर सुधीर व प्रा. आलोणी विवेक सामाजिक संशोधन पध्दती, प्रकाशन ललिता पुराणिक, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर व्दितीय आवृत्ती १९९९.

२४) भांडारकर पु.ल. सामाजिक संशोधन पध्दती, प्रकाशक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर व्दितीय आवृत्ती १९९८

२५) पाटील वा.भा. सामाजिक संशोधन पध्दती प्रशांत पब्लिकेशन पुणे २००४

संशोधक
**साहेब भिवा गजभारे**
माध्यमशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

मार्गदर्शक
**डॉ. राजेंद्र नारायणराव गोणारकर**
सहयोगी प्राध्यापक,
माध्यमशास्त्र संकुल,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.